# कुणाच्या खांद्यावर

सुधीर मुतालीक



# कुणाच्या खांद्यावर

सुधीर मुतालीक

ई साहित्य प्रतिष्ठान

# कुणाच्या खांद्यावर (kunachya khandyawar)

कथा

लेखक : सुधीर मुतालीक

Email :- sudhirmutalik@gmail.com

Ph : 91-253-2381993

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

या कथेतील सर्व पात्रे, प्रसंग आणि स्थळे पूर्णतः काल्पनिक आहेत.

वास्तवाशी संबंध आढळला तर ... नकोच...

नकोच आढळायला.

न को च !

कुणाच्या खांद्यावर ...

...... बहुदा कोण्या बड्या राजकीय नेत्याची सभा संपली असेल.

रस्त्यावर सभा संपवून परतणाऱ्या जनतेची हीईई गर्दी होती. गाड्या गोगलगाई सारख्या पुढे सरकत होत्या. ना थांबल्या होत्या ना धावत होत्या. दोन गाड्यांच्या मधून वाट थोडी मोकळी होताच लोक रस्ता ओलांडायचा प्रयत्न करत होते.

पुण्याला पोहोचायची घाई होती त्यामुळे 'कार्यकर्ता' या सुरुवातीच्याच गोगलगाय गतीला वैतागला होता. ब्रेक, क्लच आणि एक्सलरेटरवर चवडे दाबुन दाबुन वैतागला होता. वैतागाचे रुपांतर हळुहळु संतापात होत होते. पोलिस होते पण ते ही बहुदा सभेच्या बंदोबस्ताची जबाबदारी संपली म्हणून परतीच्या मागावर होते. रेडीओ मिर्ची कुठली तरी रटाळ गाणी लावत होते. त्यामुळे तीही करमणूक काही उपयोगी नव्हती. दुसरे आणि तिसरे ही स्टेशन लावायचा प्रयत्न तो करत होता. आडव्या जाणाऱ्या जनतेकडे ही अधून मधून लक्ष  देत होता. कुणी गाडीला ठोकायचा याची धास्ती होती.

आणि काच्चकन अचानक ब्रेक दाबला गेला.

...आडव्या जाणाऱ्या जनतेमध्ये त्याला गाडी समोरून "पोलिस" गेल्याचा भास झाला. सोबत आणखी दोन महिला पोलिस होत्या. खाकी साडी मधल्या. झपकन रस्ता ओलांडून गाडी समोरून गेली “पोलिस” !

हो ती “पोलिस”च होती. छातीची धडधड वाढली होती. पटकन गाडीतून उतरून तिच्या समोर जाऊन खात्री करून घ्यावी म्हणून गाडी थांबवली. पण अशक्य होते. मागे पुढे गाड्या भो भो करत होत्या. गाड्यांच्या बाजूने जनता ओसंडून वहात होती.... शिट शिट शिट म्हणत स्टियरिंगवर दोन चार गुद्दे मारण्याव्यतिरिक्त त्या क्षणी करण्यासारखे काही नव्हते.

पुन्हा पुन्हा डाव्या बाजूला वळून पाठमोऱ्या अंगाकडून ओळख पटवायचा प्रयत्न केला पण वाहती गर्दी आणि पुढे सरकण्याच्या फंदात अशक्य होते ते. पोलिस इथे कशी काय? इकडे तिची बदली झाली असेल? की इथेच असेल? हो, पण ती नक्की पोलिसच होती. शंभर टक्के. बराच काळ लोटला म्हणून काय झाले? विसरण्यासारखी ती नाहीच.

पुढे जाऊन पुन्हा मागे वळून बघू. दिसली तर ...नाही नाही शोधूच तिला. दीड दोनशे मीटरवर दुभाजकाला कट मिळाला. पटकन गाडी वळवून घेतली पण गर्दी होतीच त्याही बाजूला.

सुदैवाने काही अंतरावर गाडी लावायला जागा मिळाली. गाडी लावून कार्यकर्ता धावत सुटला. तिने रस्ता ओलांडला तिथेच भर्रकन रस्ता ओलांडून समोरच्या गल्लीत शिरून बघितलं. नाही दिसली.

"रमा पवार नावाच्या महिला पोलिस गेल्या का हो इकडून .........?...."

त्या पोलिसाने नुसतेच वैतागून बघितलं. त्याला माहिती नसेल.

"... का हो महिला पोलिसांची इथे काही छावणी किंवा निवास आहे का जवळपास?"

पोलिस थांबला " काय प्रोब्लेम काय हाय तुमचा ?"

" नाही त्यांना शोधत होतो. त्यांना त्यांच्या नातेवाईकांचा महत्वाचा निरोप द्यायचाय" दिली थाप ठोकून .

" कुटे असतात त्या? ग्रामीणला की शहरात ?" पोलिस थोडा नरमला होता.

" म्हणजे मला माहिती नाही, मला फक्त नाव सांगितलंय "

" आज बंदोबस्ताला बरेच पोलिस बलिवलेत. तसं नुस्तं नावावरनं नाही सांगता येनार. बक्कल नंबर हाय का? तो विचारून घ्या अन मंग शोधा."

कार्यकर्ता हताश. " ................ शिट " आता डाव्या हातावर उजव्या हाताने गुद्दा.

आल्या पावली गाडीकडे निघाला.जमेल तिकडे नजर फिरवत होता. कुठेतरी दिसेल अशी जाम खात्री वाटत होती. पण गाडीत बसेपर्यंत पोलिस दिसली नाही. यु टर्न घेउन गाडी पुण्याकडे दौडवली. छातीची धडधड कमी नव्हती झाली. अगदी अचानक समोर आली, बेसावध असताना. थोडी थकल्यासारखी वाटली. बंदोबस्ताच्या ताणामुळे असेल. पण इथेच तिचे पोस्टिंग असेल तर कधीतरी कुठेतरी दिसली असती. इथे नसेल. अर्थात तिला संपर्कात ठेवणे अशक्यच होते. तशी तिची अटच होती. अगदी बजावून सांगितलं होतं. शपथ वगैरे. त्याही वेळी अचानक समोर आली होती. पण आता सारखी बारा पंधरा वर्षांनी नाही. दोनेक वर्षांनी असेल.......

लाइफ केअर हॉस्पिटलच्या आवारात झाडाखाली स्वत:च्या सायकल पाठ टेकून उभा होता. रात्रभर हॉस्पिटल मध्ये जागरण झाल्यामुळे आणि जे घडलं ते इतकं भयानक होतं की त्याच्या ताणामुळे चेहरा ओढला गेला होता. डोळे तांबारले होते. कुणाशी बोलायचं नव्हतं. इच्छाच नव्हती. कंपनीत जायचं नव्हतं. इच्छाच नव्हती. अकरा वाजले असतील. मागुन काळजी आणि आश्चर्य मिश्रित बाईची हाक ऐकू आली.

"कार्यकर्ता, अरे इथे काय करतोय? "

दचकुन मागे वळून बघितलं. पोलिस होती. हातात कसली तरी फाईल. त्याला पेन खोचलेलं. काही बोलला नाही. नुसताच मंद हसला.

"कामावर नाई गेला? पोलिसी खाक्यात तिचा प्रश्न.

"अन हे काय थोबाड? नाश्ता नाई केला का ?"

" तू काय करती आहेस इथे ?"

"आमचे काय ! रुटीन पोलिसाची डुटी. सांग ना. काय काम काडलं हॉस्पिटलात ?"

त्याची काळजी करणारा तो टिपिकल ओळखीचा तिचा स्वर लागल्यावर कार्यकर्ता बोलायला लागणार एवढ्यात,

" थांब आधी काहीतरी खाऊन घे. मग च्या पिता पिता सांग. तू निघ समोरच्या कॅन्टीनकडे मी जरा डॉक्टरची सही राहलीय ती घेऊन येते. तो बाबा पुन्हा कुटे बाहेर पडला तर मला त्याच्या मागे दिवसभर फिरायला लागेल. पन तू खायला सुरुवात कर हा. माझी न्ह्यारी झालीय. मी च्या घ्याला येईन. पन तू थांब हं. खाल्ल्याशिवाय आणि माझ्याशी बोल्ल्याशिवाय नको जाऊ. बरं का. मला उशीर झाला तरी थांबच. मी येऊ का सोडायला... ?"

"नको गं. मी जातो. थांबतो कॅन्टीन मध्ये."

" तू खायला सुरुवात कर बरं का. थांबू नको माझ्यासाटी. पैसे आहेत का ....? "

किंचितसा हसला तशी पोलीसला खात्री वाटली. नेहमी प्रमाणे टप्पा नाही देणार. खाऊन घेईल.

सायकलला कुलूप लाऊन ती तिथेच ठेऊन कार्यकर्ता कॅन्टीनकडे वळला. जरा बरं वाटलं. ती भेटली. थोडा भार हलका झाला असं वाटलं. दोनेक वर्षांनी भेटली असेल पुन्हा.

शेवटची भेट मानस मध्येच झाली होती.

तिथली कॉफी तिला आवडायची. पहिल्यांदा भेटायला तिथेच बोलावले होते तिने. पोस्टकार्ड पाठवून. पंधरा पैशाला की पंचवीस पैशाला मिळायचे तेव्हा. मोबाईल नव्हते. पेजर ही नंतर तीन चार वर्षांनी आले असतील. त्यामुळे एसेमेस वगैरे पाठवण्याची मुभा नव्हती. पोस्टकार्ड पाठवून बोलावले. पत्ता अगदी हुशारीने जपून ठेवला होता.

रविवार चौकात आंदोलन केलं होतं. बस रोको आंदोलन. वीस पंचवीस पोरं होती आणि आठ दहा पोरी. कॉलेजच्या वेळात बस सोडत नव्हते. अर्ज विनंत्या करून झाल्या. बसवाल्यांचे रिक्षावाल्यांशी साटंलोटं होतं. पोरं आली होती कार्यालयात. आंदोलन ठरलं. जोरदार झाला रास्तारोको. कार्यकर्त्याने दणदणीत भाषण केलं. पोलिस सुरुवातीपासून होतेच. कार्यकर्त्याचे भाषण झाल्यावर पोरांना जास्तच चेव चढला.परिसर दणाणून गेला. पोलिस आंदोलन थांबवायला सांगत होते. कुणी ऐकायला तयार नव्हतं. सगळयांना अटक झाली. सगळयांची रवानगी पोलिस स्टेशनात. तिथे ही अधून मधून घोषणा चालू होत्या. गोंधळाने पोलिस इन्स्पेक्टर वैतागला. त्याने पोलिसला पोरांना धमकवायला पाठविलं. कोठडीत आल्या आल्या ती जोरात ओरडली.

"तुमचा लीडर कोन हाय रे"

दमदार आवाजाने सगळे शांत झाले. साधारणपणे पोरांच्याच वयाची असेल. नुकतीच भरती झाली असेल. पण एकदम धडाकेबाज होती. बिल्ल्यावर नाव होतं रमा पवार. एका आरोळीत पोरांना गप्प केलं.

"तुमचा लीडर कोन हाय?"

कार्यकर्ता पुढे झाला.

"काय नाव काय तुजं ?"

"पत्ता पन सांग. या सगळयांची नावाची आणि पत्त्याची यादी करून दे"

"आनी लक्षात ठेव. हे पोलिस स्टेशन आहे. इथं आरडा ओरडा नाई चालत. आन झाला तर तुला पैले टायरीत टाकून बुकलुन काडतील आन नंतर बाकीच्यांना. ह्यांना शांत ठेव."

"आमच्या जेवणाचे काय ?" कार्यकर्त्याने तिचे आधीचे बोलणे फारसे मनावर न घेता शांतपणे विचारले.

" आदी यादी करून ठेव. जेवनाचे बगु नंतर" पोलिस तणतणत निघून गेली.

दिवसभर पोलिसला आंदोलनकर्त्यांच्यावर वचक ठेवायला त्यांच्या सोबतच राहायचा आदेश होता. गाणी घोषणा तिला थांबवता नाही आल्या. काही वेळाने तर ती आंदोलनकर्त्यांपैकीच एक असावी आणि त्यांच्या दिमातीलाच तिला ठेवलंय असं झालं वातावरण.

कार्यकर्त्याशी तिची खास ओळख झाली . तो लीडर होता ना. त्यामुळे संवादाला निमित्त होतं. संध्याकाळी उशिरा समज देऊन आंदोलनकर्त्यांना सोडून दिलं. कार्यकर्त्याने पोलिसला इन्स्पेक्टर साहेबांची भेट घडवून द्यायला सांगितलं. साहेबाची परवानगी तिने आणली. कार्यकर्ता इन्स्पेक्टर साहेबाला भेटायला गेला. सोबत पोलिस होतीच. त्यांना झालेल्या तसदी बद्दल दिलगिरी व्यक्त केली.

"या बाईंचे ही खास आभार. दिवसभर त्यांना ही आमच्याच बरोबर अटक झाली आहे वाटत होते. त्यांना सुरुवातीला माझ्या पोरांनी थोडा मुद्दाम त्रास दिला. पण या त्यांना पुरून उरल्या. तसदी बद्दल माफ करा." पोलिस साहेबाकडे बघून आणि साहेब कार्यकर्त्याकडे बघून हसला.

"अरे पत्र आलंय तुझ्यासाठी. काकांनी घरी आणून ठेवलंय." खोलीच्या मालकीणबाईनी त्यांच्या बाल्कनीतून घरी परतणाऱ्या कार्यकर्त्याला वर्दी दिली. कार्यकर्त्याची खोली तो असला नसला तरी बंद नसायचीच. दिवसभर त्याच्या मित्रमैत्रिणींचा वावर त्याच्या खोलीत असायचा. कुणी डबा खायला, कधी बैठकीसाठी, कुणी विश्रांतीसाठी सतत असायचं.

कार्यकर्त्याला नोकरी लागली होती. त्यामुळे कामांच्या दिवसाला तो नऊ तास बाहेर असायचा. पण त्याची खोली कधी बंद नसायची. घरमालक काकाकाकू येणाऱ्या जाणाऱ्यावर नजर ठेऊन असायचे. त्यातले काही त्यांच्या परिचयाचेही झाले होते. पण काका कार्यकर्त्याची पत्रे कुणीतरी ढापतील, वाचतील म्हणून घरी आणून ठेवायचे.

......काकुनी पत्र हातात ठेवलं. पोस्ट कार्ड होतं. तीन चार ओळींचे पत्र होतं. 'रविवारी तेरा तारखेला साडेतीन वाजता कोर्ट रस्त्यावरच्या मानस मध्ये ये. बोलायचे आहे. -पोलिस. ( रमा पवार )

रविवारच्या दैनंदिनीत कार्यकर्त्याने भेटीची नोंद केली. जनरल गप्पा झाल्या तू कुठला. मी कुठली. पिक्चर. हिरो. हिरोइन. गाणी. कॉफी. राम मंदिर. अयोध्या. चळवळ. आंदोलन. शाकाहार मांसाहार. दोन तास झाले. दोन दोन कॉफी झाल्या. पंधरा दिवसांनी पुन्हा भेटू.

तेच ठिकाण. दोन दोन कॉफी. मग पुन्हा भेट. डब्यात पोलीसने केलेले अंडा ऑम्लेट. गप्पा.

पुन्हा भेट. चर्चा . गप्पा. बंदोबस्ताचा ताण. बदली झाली. दुसरे पोलिस स्टेशन. समाज व्यवस्था. जाती विषयाची चीड. विषमता. चीडचीड.

एक तास उशिरा आला. पोलिस लहानपणापासून अनाथ. मामामामीने वाढवलं. जिल्ह्यातच गाव. कथा कादंबरी पिक्चर मधलीच तिची स्टोरी. नोकरी निमित्ताने गांव सुटलं आणि मामीचा भयंकर जाच संपला. आता या शहरात गावाच्या गल्लीतली तिची ताई तिची पालक. ताईला ही माहेरची म्हणून फक्त पोलीसचा आधार. ताईचे चहाची गाडी चालवणाऱ्या अण्णाशी प्रेमविवाह. त्यामुळे ताई बहिष्कृत.

कार्यकर्त्याला अण्णा भेटला. ताई भेटली. एकत्रित जेवणं झाली.

दीड वर्ष उलटलं.

अचानकच एकदा पोलिस कार्यकर्त्याला म्हणाली "माझे तुझ्यावर प्रेम आहे."

कार्यकर्त्याने दीर्घ श्वास घेतला : "मला माहिती होते. आपल्या मैत्रीमध्ये हा दिवस येणार. तू मला हे सांगणार. आणखी एक कॉफी घेशील ना ?"

म्हणाली "हो "

"पोलिस, मी तुझ्याकडे फक्त मैत्रीण म्हणून बघितलंय. मला मैत्रीच्या पलीकडे तुझ्याकडे कधीच बघता आलं नाही. मुख्य म्हणजे मला त्या पलीकडे जायचं नव्हतं. माझ्या आयुष्याची प्रेमात पडणं वगैरे ही प्रायोरिटी नाही, सध्यातरी."

पोलिसच्या आवाजात किंवा बोलण्याच्या गतीत फरक नव्हता . "मला माहिती आहे हे सगळं. तुझ्याकडून असं कधीच ना बोललं गेलंय ना कधी वर्तन झालंय. मैत्रीची साधी थाप माझ्या पाठीवर मारण्यासाठी सुद्धा तू माझ्या अंगाला कधी हात लावला नाहीस गेल्या दीड दोन वर्षात. म्हणून तू वेगळा आहेस. आईबाप लहानपणीच गेले, कारण मीच तेव्हढी पापी आहे. त्यामुळे देवानं मला आईबापाचं सुख नाही दिलं असं मी स्वत:ला समजावत आले. पण तुझ्याशी मैत्री झाली आणि माझ्यात थोडेतरी पुण्य शिल्लक आहे असे वाटायला लागले. तू मला मैत्रीण म्हणतोस हेच माझ्यावर प्रचंड उपकार आहेत तुझे. मला तू मोठं केलंस. तुझ्यासमोर रडले तर मनसोक्त रडू दिलंस. हसले तर हसू दिलंस. कित्येक वर्षे मी माझ्यात दाबून ठेवलेलं हसू आणि रडू तुझ्यामुळे माझ्यातून मला मोकळं करता आलं. याच्या पलीकडे तुझ्याकडून काही अपेक्षा करणं म्हंजे माझा पापाचा घडा पुन्हा काटोकाट भरायला घेण्यावानी आहे. तुझी पातळी उंचावरली आहे. हे सगळं ओळखून मला माझं प्रेम तुझ्याकडे सांगायचं नव्हतं. ताईने खूप लकडा लावला होता. एकदा बोलून बघ. हो म्हणेल किंवा नाही म्हणेल. म्हणून आज सांगितलं. माझ्यावर रागावू नको."

" ए खाकी ! मी रागवेन कशाला? तुला जे वाटलं, ते तू सांगितलं. यात गैर काही नाही. फक्त जे मिळणार नाही त्याचे वाईट नको वाटून घेऊ. मला तसं वाटत नाही म्हणजे माझी तुझ्या लेखी काही किंमत कमी आहे किंवा पातळी कमी आहे वा योग्यता कमी आहे असा त्याचा काही अर्थ आहे असा ही विचार करू नको. मला माझ्याकडून प्रचंड अपेक्षा आहेत आणि त्या अपेक्षांप्रत पोहोचण्याच्या माझ्या प्रवासात मला कुणाची ससेहोलपट होऊ नये असे वाटते. त्यामुळे मैत्रीपलीकडे जाण्याचा विचार सहज माझ्या वागण्याबोलण्यात नैसर्गिकपणे येत नाहीत. इतकंच."

....पोलिसच्या अनावर हुंदक्यांनी दोघांमधला सवांद खंडित झाला. निघताना ती नॉर्मल वाटली. पुढे भेटी झाल्या. पण वारंवारता कमी झाली. सहा महिन्यांनी तिची बदली जवळच्या ग्रामीण भागात झाली त्यामुळे भेट क्वचितच व्हायची. कधीकधी तिच्याकडून कार्यकर्त्याला डबा यायचा आणि डब्यात चिठ्ठी. वेळेत जेवेत जा. आंदोलने वगैरे आता बस झालं. दिवाळीला गावाकडे जा. असे काही सल्ले असायचे.

"...... अरे हे काय अजुनी काही खाल्ले नाही? खेकसतच तिच्या विचारण्याने कॅन्टीन मध्ये बसलेल्या कार्यकर्त्याची तंद्री भंगली.

" तुला सांगितलं होतं ना तू सुरु कर म्हणून. माझी न्ह्यारी झालीय रे बाबा."

"अगं तसं काही नाही. म्हटलं थांबु तू येई पर्यंत. दीड दोन वर्षात गप्पा झाल्या नाहीत. गप्पा मारत खाऊ"

" काय सांगू तुझ्यासाठी? आम्लेट खाशील का वडा सांबर? " पोलिसालाच ओर्डर द्यायची घाई झाली.

"तू काय घेशील ?"

"अरे, सांगितलं ना, माझे पोट भरलंय. आमी काय रिकाम्या पोटी डूटी करतो व्हय?

" वडा सांबार आणि दोन चहा "

" आणि हे काय, तू खुपच बारीक झालीयस. चेहरा खप्पड झालाय ."

" मला काय झालाय बारीक व्हायला. चांगली खाऊन पिउन सुखी हाय."

" काय झालय पोलिस? कशी आहेस तू ?"

" सगळं बरं आहे रे, फक्त माझा साहेब हलकट आहे. मला उगाच त्रास देत बसतो."

"त्रास देतो म्हणजे ?"

"मेल्याची बाई गेलीय सोडून गेलीय त्याला. जानारच ना. हा रानटी ढोला हाय. डूटी संपली की रोज दारू पीऊन घरी जायचा अन रातसारी बायकोला हानायाचा. नवराच पोलिस मग ती तक्रार कुनाकडे करनार? ती गेली याला सोडून. पोरबाळ नव्हतंच. हा रिकामा. बगीन तर बगीन न्हाईतर दिन सोडून नोकरी एक दिवस. अरे माझे जाऊदे. आपन हितं तुजं बोलायला बसलोय. काय झालं? तू हितं कसा काय? हास्पिटलात? का पटवली एकादी नर्शिन ?"

मंद हसला.

" एक भीषण प्रोब्लेम झालाय "

"अरे, काय सांगशील, का जीव घेशील माझा आता ?"

" अगं, माझ्या मित्राची बायको स्टोव्हचा भडका उडून भाजलीय काल. खूप भाजलीय. लग्न होऊन वर्ष होतंय नुकतंच आणि हे असं झालंय. दोनेक महिन्याचं बाळ आहे त्याचं. तिची बिचारीची अवस्था बघून तर मी पार खचलोय. किती भयंकर वेदना होत असतील तिला. माझ्या समोर तिला पाहणं, पसंत करणं, लग्न होणं, बाळाचा जन्म हे सगळं झालंय. या अपघाताने मी खूप भेदरून गेलोय. काय करायचं सुचत नाहीय."

"अरे, देवा ! ती शिक्षिका का? देवपूरची पोरगी? काल सकाळी अकरा वाजता दाखल झाली ना ?"

" हो, पण तुला कसे डिटेल्स माहिती ...?"

"ओ, राजे ! पोलिस हाय मी. ध्यानात हाय ना? का ते ही विसरलात ?"

" तसं नाही गं, पण ..."

" तुजा मित्र डुबला म्हनुन समज ! लौकरच तो सरकारचा जावई होनार ! जेलची चक्की पिसनार "

"काय ??? कसं काय? तुला कुणी सांगितलं ?"

" अरे, त्याचा तपास माज्या ठाण्याकडेच हाय. ही काय त्याचीच कागदं घेऊन फिरतीय मी काल पासून. तपासात मी पन हाय. तो अपघात नाहीय, तो ... "

"शक्यच नाही." कार्यकर्त्याने तिला अडवलं

" अपघाता व्यतिरिक्त काही इतर संशय घेणं धादांत खोटारडे आहे. मी ओळखतो माझ्या मित्राला चांगला. त्याच्या बायकोलाही."

" हो, पण राजे, तुमाला कोन विचारतो? पुरावा गोळा झालाय. आणि केस प्रथम दर्शनी पुराव्यावर उभी रहाते. खरं खोटं कोर्ट ठरवतं. पोलिस न्हाई. मुख्य म्हंजे पोरीच्या नातेवाईकांच्या जबान्या पन झाल्यात ना. ३०२ न्हाईतर ३०६ काही पन लागु शकतो."

"म्हणजे? ३०२, ३०६ हे काय आहे ?"

" डायरेक्ट मर्डर किंवा आत्महत्या करायला भाग पाडल्याची केस आहे ही. "

" अगं मी सांगतोय ना असं काही नाहीय."

" पन पोलिसांना तू कसे सांगनार? अन पोलिसांनी तुजं का ऐकावं? पोरीच्या नातेवाईकाना कोन समाजावनार ?"

" आई ग्ग !" कार्यकर्ता हातातला कप ठेऊन डोक्याला हात लाऊन बसला.

" पोलिस, अगं काहीतरी कर ना, प्लीज. आयुष्यभर तुझे उपकार मी विसरणार नाही."

" गप रे, उपकाराची भाषा माझ्याबरोबर कशाला करतोस? तुझ्याकडे बघून मलाच आता कालवायला लागलंय. तुला मी असा कधी एवडा उदास न्हाई बघितला. हे बघ मी प्रयत्न करते. पन मी अधिकारी न्हाई. माझ्यापरीने तुज्यासाठी मी सगळं करीन. पन

तपासात बाकी पन लोक असतात ना. अन तपास अधिकारी नेमका माजा साहेबच आहे, तो डुक्कर मेला. पन तू धीर नको सोडू गड्या. माज्यावर विश्वास ठेवशील ना ?"

"अगं काय बोलतेस हे? तुझ्यावर अविश्वास दाखविण्याचा प्रश्नच येत नाही."

"चल, मी निघू का? उद्या मला इथेच भेट अकरा वाजता. मी बघते तोवर काय करता येतं का. उद्या अकरा वाजेपर्यंत तुज्या मित्राचे भविष्य ठरेल. तू काळजी नको करू, हा . आपन होईल तितकं करू तुझ्या मित्रासाठी. निघते मी." पोलिस घाई घाईत निघून गेली.

ती गेल्यावर कार्यकर्ता कोसळलाच. बराच वेळ बसून राहिला कॅन्टीन मध्ये. मित्राकडे चक्कर टाकली. त्याच्या बायकोला बघायचे धाडस नाही झालं. नातेवाईक मंडळी बाकावर सुन्न होऊन बसली होती. त्या वातावरणात पोलिसांची बाजु या विषयात कुणाशी बोलणं शक्यच नव्हतं. मित्राला असं काही सांगितलं असतं तर त्यालाच हॉस्पिटलात दाखल करावं लागलं असतं. पोलिसांच्या कारवाई विषयी कुणाशी न बोलण्याचा कार्यकर्त्याने निर्धार केला. अगदीच वेळ पडली तर काय करायचे ते प्रसंग बघून ठरवू. सध्यातरी प्रत्येकाने आपापली काळजी करावी आणि मित्राच्या बायकोची चिंता करावी असे वाटले. दिवस पुढे कसाबसा सरकत होता.

अकराला दहा मिनिटे असताना आधीच कॅन्टीन मध्ये कार्यकर्ता जाउन बसला. टेबलवर असलेले पाणी घटाघटा प्याला आणि दरवाजाकडे एकटक पहात बसला. इतक्या भेटी झाल्या पण आजवर पोलिसची इतक्या अधिरतेने कधी वाट बघितली नव्हती. गल्ल्यावर टांगलेलं मोठं चौकोनी घड्याळ संथ गतीने काटे पुढे सरकवत होतं. खुप वेळ वाट बघितली. अकरा वाजून वीस मिनिटं झाली. पोलिस अजुनी पोहोचली नाही. ती नक्की येणार

याची मात्र खात्री होती. होतो कधी कधी उशीर. तिचे कामच तसे आहे. बारा वाजले. तिचा पत्ता नाही. कार्यकर्त्याला मळमळू लागलं. ओठ कोरडे पडायला लागले. डोकं ठणकायला लागलं. पण पोलिसवर विश्वास आहे. ' पण तिला कुणी मदत केली नसेल का? याचा अर्थ मित्र खुनाच्या आरोपाखाली तुरुंगात जाणार का? पण पोलिस आहे ना ! पण ती तरी काय करणार बिचारी? त्यातच तिचा साहेब तिला त्रास देतोय. नेमकं तिच्याच परिचिताचे प्रकरण म्हणून त्याने खुन्नस काढायचे ठरविले तर? हातपाय थरथरायला लागले होते. साडेबारा वाजत आले. इतका उशीर तिला कधी होत नाही. एकदा झाला होता. इलेक्शनचे कसले ट्रेनिंग होते. पण आज काही होणार नाही हे सांगायला तरी नक्की येईल? आजारी पडली असेल का?

तेव्हढ्यात ती दारात दिसली. कार्यकर्ता एकदम उभा राहिला. हात उंचावून बसलेल्याची जागा दाखवली. पोलिस आली. घामाघूम झाली होती. आधी दोन ग्लास गटागटा पाणी प्याली. खाकी पदराने कपाळावरला घाम पुसला.

" खूप वेळ वाट बघायला लावली, सॉरी."

तिचा आवाज कमालीचा खाली गेला होता. खूप थकल्याचे जाणवत होते. केस बहुदा नीट विंचरले नव्हते. कार्यकर्त्याकडे नजरेला नजर देऊन बघत नव्हती. तिच्या टेबलावर ठेवलेल्या हाताला किंचितसा होणारा कंप जाणवत होता.

" मला सांग, तुझा मित्र या केस मध्ये अडकला तर काय होईल ?"

" पोलिस, मित्र वाचला तर मी वाचलो असे समज. माझा खूप जवळचा मित्र आहे तो. बाकी काही नाही. पण तो अडकला तर त्याचा माझ्यावर काय परिणाम होईल हे आता सांगता येणार नाही."

ती थांबली. पदराने पुन्हा एकदा कपाळ पुसलं. मग म्हणाली,

" ठीक आहे. अजुनी तपासाचं काम पुढं सरकलं नाही. काही कागदपत्रं अजुनी माझ्याचकड आहेत. घरी ठेवलेत. मिळाली नाही असं सायबाला सांगितलंय."

"तुझा त्या डुक्कर साहेबाकडेच सगळा निर्णय आहे का गं"

होकारार्थी मान हलवली. कार्यकर्त्याकडे बघितलं नाही. थोडावेळ कुणीच बोललं नाही. अचानक आपण हॉस्पिटलच्या कॅन्टीनमध्ये बसलोय याचं भान विसरून टेबलवर तिने कार्यकर्त्याचे दोनही हात आपल्या हाताच्या ओंजळी मध्ये घट्ट पकडले. तिचा परिचय झाल्यापासूनचा हा पहिलाच स्पर्श.

" चिंता नको करू. मी काढीन तुज्या मित्राला या केस मधून बाहेर. तुझ्यासाठी. माझे तुझ्यावरचे प्रेम एकतर्फी असले तरी ते मी मरेपर्यंत राहील. माझी तुझ्याकडून कधीच काहीच अपेक्षा नव्हती आणि नसनार. तुझी असली अवस्था मला नाही बगवत, गड्या. आज चार वाजेपर्यंत मला वेळ दे. मी तुला सांगीन काय करायचे ते. इथेच भेटू. माज्यावर विश्वास ठेव. निघते मी. चार वाजता इथेच भेटु." कार्यकर्त्याला फारसं बोलू न देता निघून गेली.

एका बाजुला थोडा धीर आला होता. पण हातात निर्णय नव्हता. कार्यकर्त्याने चहा मागवला. चहा प्यायल्यावर त्याला जरा तरतरी आली. उठून तडक खोलीवर गेला. आंघोळ केली. डबा आला होता. जेवण केले आणि बिछान्यावर अंग टेकवलं. दोन रात्री हॉस्पिटलात झोपेचं खोबरं झालं होतं. जाग आली तेव्हा पावणे चार वाजले होते. उशीर झाला होता. कॅन्टीन जवळ पोहोचला तेव्हा चार वीस झाले होते. सायकल तशीच टाकली आणि पळाला.

पोलिस येउन थांबली होती. दारात उभी होती.

"कधी आलीस ?"

" चार वाजता "

" चल बसू चहा घेणार? "

"नको"

"बोल काय झालं "

" होईल तुजं काम."

"एवढी शांत का आहेस? थकली आहेस का? चहा सांगतो दोन "

"मी ठीक आहे " पोलिस सलग कार्यकर्त्याकडे बघत होती. त्याला लक्षात आलं.

" खोलीवर जाऊन झोपलो होतो तासभर."

" मी काय सांगते ते नीट ध्यानात ठेव. तुजं काम झालंय. दोन गोष्टी तुला कराव्या लागतील."

"कोणत्या?"

" एकतर दहाहजार रुपये द्यावे लागतील ... "

" काय ?" कार्यकर्ता ताडकन उठलाच.

" ऐक रे, बैस तू पैले."

" अगं पण कशासाठी? लाच? एवढी मोठी रक्कम ?"

" ही केस साधी सोपी नाही, रे गड्या. माझे मलाच माहिती त्यात काय काय आहे ते "

" काय आहे त्यात? माझा मित्र निर्दोष आहे आणि त्याला निर्दोष साबित करण्यासाठी लाच द्यायची? आणि दहा हजार? "

पोलिसचा चेहरा मलूल झालेला. ती कळवळून म्हणाली

" त्या शिवाय दुसरा पर्याय नाई तुज्यापुडे. तपासात माज्या शिवाय आनखी तीन पोलिस आहेत, सायबाला सोडून "

" म्हंजे प्रत्येकाला अडीच हजार असेच ना? "

" तोंड माजे लचके अन घाल कुत्र्याला" ती रडकुंडीला आली.

" अरे, तुज्याकडून मी पैशे काडेल असं तुला वाटते? तुज्याकडूनच काय अट्टल चोराकडून पन मी कधी हरामची दिमडी नाई घेतली. तुज्यासारख्याशी दोस्ती केल्यावर मी असं कधी करेन का? "

"आणि तुझ्या त्या डुक्कर सायबाचे काय?"

काही बोलली नाही.

"सांग ना तुझ्या सायबाचे काय? का तीच दुसरी गोष्ट आहे ?"

" नाई ती नाई दुसरी गोष्ट, सायबाचे मी बघून घेईन. तू त्याची काळजी करू नको."

"मग दुसरी गोष्ट काय ?"

" सांगते. पन उद्या सकाळी दहा वाजेपर्यंत पैसे लागतील. कॅन्टीनच्या गल्ल्यावर ठेऊन दे. ते आमच्या पोलीसापर्यंत पोचतील. पैसे पोचले की लगेच एका तासात तुज्या मित्राचे केसचे पेपर फाडून टाकतील ते. त्याच्यापर्यंत कुटलाच विषय कदीच नाई येनार. मी ग्यारंटी हाय."

कार्यकर्ता चक्रावला होता.

" भयानक आहे हे सगळं "

" तुला जे समजत नाई ते, भयानक आहे रे गड्या "

" म्हणजे ?"

" म्हंजे काय नाई. तू तुजं काम कर"

" आणि दुसरी गोष्ट काय सांग ना"

" सांगते ना, घाई नको करूस. मला च्या तर पिऊ दे. बरं हे सगळं बरोबर करशील ना? यात काही शंका आहे का? आत्ताच विचार."

कार्यकर्त्याला आज ती काहीतरी वेगळी वाटत होती. पण तिच्यावर विश्वास ठेऊन ती म्हणते ते करणं भाग होतं. कारण दुसरा पर्याय नव्हता. अन्यथा मित्र अडकला असता.

" शंका काही नाही. दहा हजार रुपये ही रक्कम प्रचंड मोठी आहे."

पुन्हा तिने तिच्या ओंजळीत हात घेतले. डोळे फाडून कार्यकर्त्याकडे बघत होती. कार्यकर्त्याने तिच्याकडे बघितले पण फार काळ तिच्या डोळयात बघू शकला नाही. अवघडल्यामुळे इकडे तिकडे पहात हात सोडवून घेत त्याने विचारले

" दुसरे काय करायचे ते सांग ना ."

" करशील ना नक्की ?"

" करावेच लागेल. परिस्थिती अशी आहे की तू जे म्हणशील ते करण्यावाचून पर्याय नाही."

" आजपासून मी तुला मेले. मला कधी भेटू नको अन मी पन तुला कधी भेटनार नाई. आपन कदी भेटलोच नाई. "

" काय, हे काय विचित्र ?" कार्यकर्ता किंचाळलाच !

" काळजी घे स्वत:ची. वेळेवर जेवत खात जा " भर्रकन निघून गेली.

कार्यकर्त्याला काही समजलंच नाही. दोनही गोष्टींनी तो ठार वेडा झाला होता. पहिली गोष्ट कठीण होती आणि दुसऱ्या गोष्टीचा अर्थ समजायला महाकठीण होता.

साडेपाच वाजले होते. पंधरासोळा तासाच्या कालावधीत दहा हजार रुपये मिळवायचे होते. कार्यकर्त्याच्या बँकेत खच्चुन सात आठशे रुपये असतील. अर्थात त्याचा काही उपयोग नव्हता. कारण आता बँक बंद झाली असेल आणि उद्या दहा वाजल्याशिवाय

उघडणार नाही. मित्राला सांगून रिस्क घ्यायची नव्हती, कारण त्याला हे सगळं प्रकरण समजले तर तो आणखी खचेल. शिवाय ज्या त्याच्या नातेवाईकांनी उलट सुलट जबानी देऊन त्याला गोत्यात आणलंय ते जागे होतील. कुणालाच अगदी कुणालाच पैसे कशासाठी हवेत आणि एकूण काय प्रकरण आहे हे समजता कामा नये. नेमकी या तपासाच्या प्रकरणात पोलिस नसती तर आज काय झाले असते कुणास ठाऊक. तिच्यामुळे आज वाचलो.

रात्रभर पाचशे आठशे उधार मागत दहाहजार एकट्याने जमवले आणि दुसऱ्या दिवशी गल्ल्यावर ठेवले. ते दहा हजार पुढले काही महिने आणि वर्षे फेडत राहिला. प्रत्यक्ष भाजल्याची बातमी समजल्यावर दहा हजार रुपये गल्ल्यावर ठेवे पर्यंतचा तीन चार दिवसांचा काळ अत्यंत भीषण होता. पण तो सरकला.

मित्र वाचला. ना त्याला ना आणखी कुणाला, कुणालाच या एकूण प्रकरणाचा थांगपत्ताही लागला नाही, आज तागायत. ते गुपितच राहिलं.

" हा साहेब, रिटर्न देऊ की सिंगल .... "

बापरे त्या इतिहासाची फिल्म डोळयांसमोर सरकत असताना पुण्याचा टोल नाका ही आला ! कार्यकर्ता पूर्ण हरवून गेला होता. गाडी तंद्रीतच चालवत होता. आज अचानक पोलिस दिसली आणि आठवणी ताज्या झाल्या खुप वर्षांनी. पण आता पुन्हा एकदा पोलिसला शोधलं पाहिजे. तिने अट घातलीय. पण त्यावेळी त्या अटीकडे फारसे लक्ष द्यायला वेळ नव्हता आणि तसे ही त्या आधी दोन वर्षे प्रत्यक्ष संपर्क नव्हताच. आता खूप काळ निघून गेलाय.

तिचे लग्न झाले असेल. लग्न संसाराच्या चक्रात माणसाला नवे संदर्भ प्राप्त होतात आणि आपल्या भूतकाळाकडे वेगळया नजरेनं बघता येतं. अशावेळी तरुणपणातल्या घटना गमतीदार वाटतात. आज तेवढं त्या घटनांची संवेदना तीव्र नसते. किंबहुना अशा घटनांसंदर्भात संवेदना नाहीशी झालेली असते. त्यामुळे हरकत नाही. पोलीसला आता भेटायला हरकत नाही.

पुण्यातले काम संपवून कार्यकर्ता परतल्यावर पहिल्यांदा त्याने परिचयाच्या पोलिस अधिकाऱ्याला फोन केला. पण रमा पवार नावाचे त्याला कुणी माहिती नव्हतं. तो शोधून सांगतो म्हणाला पण तो ते करेल याची खात्री नव्हती. लग्न झाले असेल तर आता इतक्या वर्षांनी तिने नसले तरी बाकीच्या फौजफाट्याने तिचे आधीचे नाव लक्षात ठेवण्याची शक्यता फारशी नव्हती.

आठेक दिवसाच्या प्रयत्नानंतर त्याला अण्णाची आठवण झाली. टपरीच्या ठिकाणी गेला. पण तिथे चहाची टपरी नव्हती. तिथे आता उंच इमारती उभ्या होत्या आणि इतका

बदल झाला होता की तिथे टपरी होती हे कुणाला सांगताही येईना. अण्णा हा तिच्या पर्यंत पोचण्याचा शेवटचा दुवा होता.

कार्यकर्ता आता खचला. पण पोलिसला शोधण्याचा त्याने ध्यासच घेतला. त्या आधी अण्णाला शोधणे गरजेचे होते. अण्णाची बायको मराठी होती आणि ती जवळपासच्या गावातली होती एवढीच त्याची खुण कार्यकर्त्याकडे होती. शहरातल्या एकेक चहा आणि पानवाल्या अण्णांना त्याने विचारायला सुरुवात केली. महिना उलटला तरी काही मागमूस लागला नाही. पण एक बातमी मिळाली. अण्णाची टपरी होती त्याच्या शेजारी एक वडापावची गाडी होती त्याचा पत्ता आणि मोबाईल नंबर मिळाला. त्याच्याकडून अण्णाचा मोबाईल नंबर मिळाला.

अण्णाने ओळख पटवून दिल्यावर फोन कट केला. गूढ वाढले होते. पुन्हा एकदा वडापाव वाल्याचे पाय धरावे लागले. त्याने अण्णाच्या टपरीचा पत्ता दिला. भेटल्यावर अण्णा अजिबात बोलायला तयार नव्हता. सलग तीन दिवस कार्यकर्ता त्याच्याकडे जायचा.

" अरे जाव ना बाबा क्यो धंदे की खोटी कर रा है. हमको कुछ मालूम नही. खाली पिली त्रास मत दो हमको." असलं काही बोलून कार्यकर्त्याला पिटाळून लावायचा. शेवटी एक दिवस कार्यकर्ता सहा तास थांबला त्याच्या टपरीवर. बंद करून तो घरी जायला निघाला तेव्हा त्याच्या मागे मागे जायला लागला. तेव्हा कुठे थांबून अण्णा सरळ बोलायला तयार झाला.

" कल सुबह घर आ जाव. उसकी ताई रहेगी उसको सब पूछना." घरचा पत्ता दिला. घराजवळची खुण सांगितली. आणि अण्णा निघून गेला. रात्रभर कार्यकर्ता अण्णाच्या विचित्र वागणुकीचा विचार करत होता. असा का वागला अण्णा? नेमकं काय झालं असेल? पोलिस तर दिसली हे निश्चित म्हणजे ती व्यवस्थित असेल, म्हणजे आहेच. सकाळी अकराच्या सुमारास कार्यकर्ता अण्णाच्या घरी पोहोचला. ताई होती. केस पांढरे झाले होते. चेहऱ्यावर चष्मा चढला होता.

" ये की. किती दिवसांनी रे. काय ताईची आटवन झाली नाई का? आता मोटा झालास तु. स्वत:च्या गाडीनं फिरतुस."

" हो, ताई खूप दिवसांनी आलो. हे खरंय. आता येत जाईन. तुम्ही कशा आहात?"

" आमचं काय रे. मला अण्णा आणि त्याला मी. चालू हाय आमचा संसार सुकानं. लगीन केलंयस काय? पोरं किती? "

" हो ताई लग्न झालं आठ वर्षापूर्वी. एक मुलगी आहे. एकच. बायको इंदूरची आहे. ती बँकेत नोकरी करते."

" छान झालं बघ. बायकोला घेऊन यायचं ना रे."

" हो घेऊन येईन एकदा. ताई, पोलिसचं कसं चाललंय ?"

"रमी? हममम!!! कुनाला तरी सोडवन्यासाठी, कोंची तरी केस मागं घेन्याच्या बदल्यात पोरीनं तिच्या सायबाशी लगीन केलं ............. "

( The end )

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भॆट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शॆजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी

पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. सहा वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना सुमारे चारशे, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. चारशे गुणिले दोन लाख म्हणजे आठ कोटी पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े वितरित झाली असे म्हणता येईल. विनामूल्य. तसे पाहिले तर हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय.

प्रिय वाचक. तुमच्या ओळखीतल्या ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून काहीच वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर दहा किंवा अधिक पत्ते पाठवणाऱ्यांना ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. या VIP सदस्यांना प्रत्येक पुस्तक सर्वात आधी पाठवले जाईल. त्याचबरोबर ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व स्कीम्समध्ये सहभागी करून घेतले जाईल.

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान